# महाविद्यालय विकास समिती सहविचार सभा इतिवृत्त

**दिनांक :- १६/०१/२०२५**

क १६/१/२०२५ रोजी सकाळी ११:30 वाजता महाविद्यालय विकास समितीची सहविचार सभा माननीय यक्ष डॉ. विजय नारखेडे, सहसंचालक उच्च शिक्षण कोकण विभाग, पनवेल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित ण्यात आली. सदर सहविचार सभेसाठी मा. सचिव महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ .रमा भोसले मॅडम, श्री एन. खान, प्रा.संदीप वाघ सर्व प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधी सविता मुळीक व अविनाश काटवटे हे सर्व सदस्य पस्थित होते.

हाविद्यालय विकास समिती समन्वयक डॉ उज्वला डोणे यांनी मा. अध्यक्ष तसेच मा. प्राचार्य सर्व समिती सदस्य र्व प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधी या सर्वांचे स्वागत केले. मा. सचिव डॉ. रमा भोसले मॅडम यांनी उपस्थित दस्य एन डी खान सर व संदीप वाघ सर यांचे पुष्प देऊन स्वागत केले.

**भेमध्ये पुढील विषयांवर चर्चा करण्यात आली**

1) **मागील सभेचे इतिवृत्त वाचन करणे :-** सभेच्या सुरुवातीला डॉ. डोणे यांनी मागील सभेचा वृत्तांत वाचून कायम करण्यात आला. समिती सदस्यांनी त्यास मान्यता दिली.

2) **7 फेब्रुवारी 2025 रोजी संपन्न होणाऱ्या राष्ट्रीय परिसंवादाचे नियोजन करणे :-** मुंबई विद्यापीठ आयसीएसएसआर अंतर्गत नॅशनल परिसंवादासाठी निधी मंजूर झाला आहे व सदर राष्ट्रीय परिसंवाद 07 फेब्रुवारी 2025 रोजी संपन्न होणार आहे त्याचे ब्रोशर बी.एड, एम.एड, पी.एचडीचे विद्यार्थी तसेच नियमित बी.एड चे विद्यार्थी इतर स्थानिक शिक्षक व प्राध्यापक यांना पाठवले असून ते त्यामध्ये सहभागी होणार आहेत. जे शिक्षक प्रत्यक्ष उपस्थित राहू शकणार नाहीत ते वर्चुअली उपस्थित राहू शकतील असे मा. प्राचार्यांनी सुचित केले. तज्ञ मार्गदर्शक म्हणून गोगटे जोगळेकर कॉलेज भूगोल विभाग प्रमुख डॉ. सुरेंद्र ठाकूर देसाई, तसेच गोव्याहून प्रा.मृणाल सुर्वे तसेच डॉ.फ्लोरी पेरेरा हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सेमिनारच्या पूर्वतयारीसाठी तयार केलेल्या समित्या पुढील प्रमाणे

1) **स्वागत समिती प्रमुख :- डॉ. प्रियंका सुभेदार**
2) **बैठक व्यवस्था व हॉल सजावट:- डॉ. नीलिमा मोरे**
3) **रजिस्ट्रेशन व रांगोळी प्रमुख:- प्राध्यापक बिजली दडपे,**
4) **प्रदर्शन मांडणी प्रमुख डॉ. उज्वला डोणे**
5) **परिसर स्वच्छता व बाह्य सजावट प्रमुख:- डॉ. बी जी खाडे**

Scanned with OKEN Scanner

6) अल्पोपहार व भोजन समिती प्रमुख :- डॉ. उज्वला डोणे व शाहीन मुजावर

7) आयसीटी प्रमुख :- हिमानी मोकल

या प्रत्येक समितीमध्ये प्रथम आणि द्वितीय वर्षाचे विद्यार्थी विभागले जातील त्यानुसार प्रत्येक प्राध्यापकाने तयारी करावी असे मा. प्राचार्यांनी सुचित केले.

**3) आयसीटी अंतर्गत Add on course सुरू करणे--** विद्यार्थ्यांना डिजिटल कंटेंट तयार करता यावा यासाठी आयसीटी अंतर्गत प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी सेमिनार दोन मध्ये हा कोर्स सुरू करता येईल यासाठी श्री सौरभ सोमानी यांनी अभ्यासक्रम तयार केला असून हा अभ्यासक्रम सहा महिन्याचा आहे असे मा. प्राचार्यांनी सुचित केले. सदर अभ्यासक्रमास सभेमध्ये मंजुरी घेण्यात आली व आयसीटी अंतर्गत सदर कोर्स सुरू करण्याचे ठरले.

**4) द्वितीय वर्ष बी.एड सत्र तीन करता मुंबई विद्यापीठ परीक्षेचे नियोजन करणे--** 28 /1/2025 पासून द्वितीय वर्षाची परीक्षा सुरू होणार असून सध्या मुंबई विद्यापीठाने महाविद्यालयाला परीक्षा केंद्र जाहीर केलेले नाही पण ऐन वेळेला परीक्षा केंद्र जाहीर झाले तर त्यानुसार परीक्षेची तयारी डॉ. पी पी सुभेदार मॅडम यांनी करावी असे मा. प्राचार्यांनी सुचित केले.

**5) AISHE माहितीस मान्यता घेणे--** AISHE ची माहिती भरून वेळेत पाठवलेली आहे शिवाय त्याचे सर्टिफिकेट ही तयार केले आहे. सदर माहिती मुंबई विद्यापीठाकडे पाठवून त्यास मान्यता घेणे बाकी असल्याचे मा. प्राचार्यांनी सांगितले.

**6) महाविद्यालयाला प्राप्त झालेल्या दोन कोटी 81 लाख रकमेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे महाविद्यालय नूतनीकरण कामासाठी पाठपुरावा करणे--** सन 2024 मध्ये महाविद्यालयाला uplifting scheme. द्वारे दोन कोटी 81 लाख रक्कम नूतनीकरणासाठी मंजूर झालेले आहे. सदर रक्कम ही वसतीगृह नूतनीकरणाची आहे का? यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत संभ्रमावस्था होती. वसतीगृह नूतनीकरणाचे काम हे वेगळे असल्याचे मा. प्राचार्यांनी सूचित केले त्यामुळे सदर संभ्रमावस्था सध्या दूर झाली असून सदर रक्कम एप्रिल 2025 नंतर मंजूर होईल व त्यानंतर महाविद्यालय नूतनीकरण कामास सुरुवात होईल असे मा. प्राचार्यांनी सुचित केले.

**7 ऐन वेळचे विषय---** a) short term व long term goal साठी प्रत्येक प्राध्यापकाने विषयानुसार Activity Based तक्ता तयार करून तो आपापल्या विषय विभागांमध्ये लावावा व त्याचे नियोजन करून ॲक्टिव्हिटी घ्याव्यात सदर ॲक्टिव्हिटी या NAAC साठी उपयोगी असल्याचे मा. प्राचार्यांनी सुचित केले.

Scanned with OKEN Scanner

b) सध्या महाविद्यालयात सुरू असलेल्या अभ्यास पूरक उपक्रमासाठी काही मदतीची आवश्यकता असेल तर आम्ही मदत करू असे अमरदीप बालविकास फाउंडेशनचे अध्यक्ष मा .एन.डी. खान सर यांनी सुचित केले.

सध्या प्रथम आणि द्वितीय वर्ष बीएड यांचा आंतरवासिता उपक्रम मार्चपर्यंत पूर्ण होणे आवश्यक आहे व त्यास प्राधान्य दिले जाईल असे मा. प्राचार्यांनी सूचित केले. एप्रिल नंतर महाविद्यालयात नव्याने घ्यावयाच्या कार्यक्रमाचे नियोजन केले जाईल असेही मा. प्राचार्यांनी सांगितले.

c) द्वितीय वर्ष विद्यार्थी अविनाश काठवटेची फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या अखिल भारतीय एल्गार गझल परिषदेत ( अंबाजोगाई) गझल सादरीकरणासाठी निमंत्रित गझलकार म्हणून स्थान मिळाले आहे. त्याच्या या विशेष गौरवास्पद कामगिरीबद्दल मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी हार्दिक अभिनंदन केले.

सभेच्या शेवटी डॉक्टर उज्वला डोणे यांनी मा. अध्यक्ष डॉ. विजय नारखेडे सर महाविद्यालयाच्या प्राचार्या व समिती सचिव डॉ. रमा भोसले मॅडम मा. श्री एन. डी. खान सर मा. श्री संदीप वाघ तसेच उपस्थित सर्व प्राध्यापक विद्यार्थी प्रतिनिधी अविनाश काठवटे व सविता मुळीक यांचे आभार व्यक्त करून सदर सुविचार सभा मा. प्राचार्यांच्या अनुमतीने संपन्न झाल्याचे जाहीर केले.

Government College of Education ★ Panvel ★

RBhoslay

**Principal**

Government College of Education (C.T.E.)
Panvel, Dist. Raigad - 410 206.

Scanned with OKEN Scanner